प्रेसनोट दिनांक ०९/०३/२०१९

## विमानतळ पोलीस स्टेशन

## चोरीच्या गुन्हा मध्ये चार आरोपीस अटक करुन गुन्हयातील माल जप्त केला

विमानतळ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ११२/२०१९ भा.दं.वि.कलम ३७९,४०६,३४ या गुन्हयातीलफिर्यादी नामे चेतन सुरेश जावळे वय ३४ धंदा नोकरी रा. सर्व्हे नं.२७,पंचशिलनगर,येरवडा पुणे हे लुंकड रियालिटी कन्ट्रक्शन कंपनीमध्ये नोकरी करीत असुन त्यांचे कंपनीचे सर्व्हे नं.२३९ संजयपार्क बेलवेडरे सोसायटीचे जवळ विमाननगर पुणे येथे बांधकाम चालु असल्याने सदर बांधकामासाठी लागणारे स्टिल मधील जामठानी ॲन्ड कंपनी यांचेकडुन आलेल्या ट्रेलर नंबर एम एच -४६ एच डी ५७२५ मधील सुमारे ३.८ टन स्टिल आणि एस.आर.जे पी.टी. स्टील प्रा.लिमी. कंपनी यांचेकडुन आलेला ट्रेलर नंबर एम एच ४६/बी एफ ५८३९मधील सुमारे ४६१ किलो स्टिल असे एकुण १,६८,०००/- रुपयाचे एकुण ४ टन २६१ किलो स्टिल कोणीतरी चोरुन नेलेले आहे अशी तक्रार दिल्याने वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे तपास पथक प्रभारी अधिकारी यांचेकडे दिलेला होता.

पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे व त्यांचेकडील स्टाफ पोलीस हवा.५३५१ आटोळे, पो.ना १७६२ विशाल गाडे,पो.ना. २२६९ आढारी, पो ना. २५७६ गोणे, पो शि. ८८३४ चव्हाण,पो शि.७३०१ कापुरे,पोशि ७४५३ महाजन यांनी आरोपींची माहीती काढुन व शोध घेवुन आरोपी नामे १. बाळासाहेब मोहन खताळ वय २९ वर्षे रा. मु.पो. वरझरी ता. पाटोदा जिल्हा बिड, २.रमेश रामहिरक बिंद वय ४६ वर्षे रा. मु.पो. सदरपुर बरोरी ता. फलपुर जिल्हा आझमगढ यांना दिनांक ७/०३/२०१९ रोजी २२/३० वाजता अटक करुन त्यांची तपासकामी पोलीस कस्टडीचे घेवुन आरोपी क्रं. ०१ यास विश्वसात घेवुन त्याचेकडे गुन्हयातील चोरीस गेलेले मालाचा तपास केला असता त्याने निवेदन की, गुन्हयातील चोरी गेला माल हा वाघोली पुणे येथील गोडावुन मालकाचे सांगणेवरुन काढुन ठेवला असल्याची माहीती दिल्याने गोडावुन मालक रुपेश चंद्रकांत मोरे वय ३१ वर्षे रा.फलॅटन नंबर ३०३ चंदननगर शॉपींग कॉम्पलेक्स शिवाजी पुतळया समोर चंदननगर पुणे व ट्रेलर मालक कैलास वाल्मीक मस्के वय ३१ वर्शे रा. ए /१३३ गजानन नगर, रहाटणी काळेवाडी पिंपरी पुणे.यांचकडे तपास करता त्यांनी गुन्हा केला असल्याची कबुली दिली. ट्रक चालकांकडे वजन कोठे केले? याबाबत विचारपुस केली असता त्याने वाघोली रोडवरील मारुती वजनकाटा हा दाखवुन दिल्याने सदर वजनकाटा मालक भाऊसाहेब रावसाहेब वारे वय ३४ वर्षे रा. बी /९ ओझन व्हिला वाघेश्वर मंदीरा शेजारी वाघोली पुणे मुळ रा.मारुतीची पांगरी ता. शिरुर कासार जिल्हा बिड यांचेकडे अधिक तपास करता त्यांनी वजनामध्ये फेरफार केला असल्याचे तपासामध्ये निषन्न झाले आहे. ट्रेलरचे वजन करतेवेळी कंपनीचे कर्मचारी हजर असल्याचे फिर्यादी मध्ये नमुद असल्याने कंपनीतील कर्मचारी नामे अमोल मारुती चव्हाण वय ३१ वर्षेरा. मु.पो.भुड, ता. खानापुर जिल्हा सांगली सध्या रा. फॅलट नं. २०३,सुवर्णा प्लाझा बिल्डींग पॉवर हाऊस फुरसुंगी पुणे यांचेकडे अधिक तपास करता त्याने गुन्हा केला असल्याची कबुली दिलेली आहे. तसेच गुन्हयातील चोरलेल्या स्टिलच्या सळई (माल) गोडावुन मालक रुपेश चंद्रकांत मोरे वय ३१ वर्षे रा.फलॅटन नंबर ३०३ चंदननगर शॉपींग कॉम्पलेक्स शिवाजी पुतळया समोर चंदननगर पुणे यांनी त्यांचे गोडावुन मधुन काढुन दिल्याने तो माल व गुन्हा करतांना वापरलेले २ कंटेनर पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे यांनी गुन्हयाचे कामी जप्त केलेले आहे. तसेच दाखल गुन्हयात एकुण ०६ आरोपी करण्यात आलेले आहे. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक श्री पिगळे विमानतळ पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहेत.

(राजेंद्र पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर